CICR-Leaflet 2023/00

भा.कृ.अनु.प. - केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

पोस्ट बॅग नं.२, शंकर नगर पोस्ट ऑफिस, नागपूर ४४००१०

# कपाशीमध्ये सध्यस्थितीत आढळणाऱ्या रोगांचे एकात्मिक व्यवस्थापन

## कोरीनोस्पोरा पानांवरील ठिपके: कोरीनोस्पोरा कॅसीकोला (बुरशीजन्य)

हा बुरशी जन्य रोग साधारणतः सप्टेंबर ते डिसेंबर महिन्यात कपाशीवर आढळतो. सुरवातीस जमिनी लगतच्या पानांवर रोगाची लागण होऊन टोकाकडच्या पानांकडे याचा प्रसार होतो. रोगग्रस्त पानांवर गोलाकार किंवा अनियमित आकाराचे, गडद लाल रंगाचे, लहान लहान ठिपके पडतात व त्यांचा आकार वाढून पानांवर गडद कडा असलेले तपकिरी डाग दिसू लागतात.

- पीक वाढीच्या अवस्थेत पानांवर हा बुरशीजन्य रोग आढळल्यास कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्लू.पी.) ४ ग्रॅम किंवा मेटीराम ५५ टक्के + पायराक्लोस्ट्रोबीन ५ टक्के डब्लू.जी. २० ग्रॅम किंवा प्रोपीकॉनाझोल २५ % ई.सी. १० मिली किंवा अझोकझीस्टोबीन १८.२% + डायफेनकोनाझोल ११.४ % १० मिली किंवा क्रेसोक्षिम मिथाईल ४४.३ % एस.सी १० मिली किंवा फ्लूकझापायरोकझाड १६७ + पायराक्लोस्ट्रोबीन ३३३ ग्रा/लि एस.सी ६ ग्रा प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.


## दहिया (बुरशीजन्य): रामुलारिया अरीओला

मुख्यत्वे जुन्या पानांवर वातावरणातील तापमान कमी झाले कि पांढऱ्या रंगाची बुरशी वाढते. ही रोगग्रस्त पाने दही शिंपडल्यासारखी दिसतात. पांढऱ्या रंगाच्या बुरशीचा साधारणतः पानांच्या खालच्या बाजुस अधिक प्रादुर्भाव होतो. रोगाचे प्रमाण अधिक असेल तर पाने पिवळी आणि तांबडी होऊन गळून पडतात.


- कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्लू. पी. ३० ग्राम किंवा अझोकझीस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनाझोल ११.४ % एस.सी १० मिली किंवा क्रेसोक्षिम मिथाईल ४४.३% एस.सी १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## कपाशीतील बोंड सडण्याची विकृतीचे एकात्मिक व्यवस्थापन


- बोंडाना चिकटून राहिलेल्या सुकलेल्या पाकळ्या शक्यतो हाताने काढून टाकाव्यात जेणेकरून त्याठिकाणी रोगकारक घटकांची वाढ होणार नाही.
- पात्या, फुले आणि बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत रस शोषणारे ढेकुनांच्या नियंत्रणासाठी वेळेत योग्य उपाय योजना कराव्यात.
- सततचे ढगाळ वातावरण, हवेतील अति आद्रता व रिमझिम पाउस दीर्घ काळ राहिल्यास खबरदारीचा उपाय म्हणूनआंतरिक बोंड सडण्याच्या विकृती व्यवस्थापनासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्लु.पी. (२५ ग्रॅ) प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पात्या, फुले आणि बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत फवारणी करावी.
- पीक वाढीच्या अवस्थेत बाह्य बोंडसड रोखण्यासाठी कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्लू.पी.) ४ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% डब्लू. पी. ३० ग्राम किंवा मेटीराम ५५ टक्के+ पायराक्लोस्ट्रोबीन ५ टक्के डब्लू.जी. २० ग्रॅम किंवा प्रोपीकॉनाझोल २५ % एस.सी १० मीली किंवा अझोकझीस्ट्रोबीन १८.२% + डायफेनकोनाझोल ११.४ %१० मीली किंवा क्रेसोक्षिममिथाईल ४४.३ % एस.सी १० मिली किंवा फ्लूकझापायरोकझाड १६७ + पायराक्लोस्ट्रोबीन ३३३ एस.सी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



कोरीनोस्पारा पानांवरील ठिपके



दहिया



अंतर्गत व बाह्य बोंडसड

कृषि एवं किसान कल्याण मंत्रालय आणि वस्त्र मंत्रालय, भारत सरकार द्वारा अर्थसहाय्यीत ''कापूस विशेष प्रकल्प''

(कृषि पर्यावरणीय क्षेत्रांना लक्षित तंत्रज्ञान: कापूस उत्पादकता वाढविण्यासाठी सर्वोत्तम पद्धतींचे मोठ्या प्रमाणावर प्रात्यक्षिके)

तांत्रिक माहिती : शैलेश पां. गावंडे, दीपक नगराळे, निलकंठ हिरेमणी आणि जी. टी. बेहेरे

प्रकाशक : डॉ. वाय. जी. प्रसाद, संचालक, केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर